


मेहमूद - शुभा खोटे

अनेक चित्रपटांमधून ही जोडी आपल्याला दिसली ती बरेचदा विनोदी प्रसंगात. मात्र आकाशदीपमध्ये मेहमूदच्या दणकट मिठीतून स्वतःला सोडवण्याचा प्रयत्न करणारी शुभा खोटे. ही जवळीक हवीहवीशी वाटते तरीही दूर जाण्याचा लटका प्रयत्न का? हे दोघंही आघाडीचे कलाकार फक्त कॉमेडीच करत नव्हते तर कॉमेडीबरोबर गंभीर - रोमॅण्टिक अभिनयातही किती माहिर होते त्याचं हे बोलकं उदाहरण.